
● सोमवार, दि १६ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५७ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेश्वरहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शाश्वत विकासासाठी कालिका स्टीलचे 'एक पाऊल पुढे'

## प्रदर्शनात बीएनसीए पुणे प्रथम, कोल्हापूर येथील महाविद्यालय द्वितीय तर नासिक येथील एमपीव्हीएस महाविद्यालयाचा तृतीय क्रमांक










**जालना । प्रतिनिधी -** शाश्वत विकासाची संकल्पना घेऊन कालिका स्टील कंपनीने क्रियट उपक्रमांतर्गत राज्यभरातील इंजीनियरिंग आणि आर्किटेक्चर करणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र करत एक महत्त्वपूर्ण स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत राज्यभरातील ४८ संघाद्वारे तब्बल एक हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या नावीन्यपूर्ण कल्पना वेगवेगळ्या प्रकल्पाच्या माध्यमातून मांडल्या आहेत. त्यापैकी तीन संघांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशी तीन पारितोषिके देण्यात आलीत.

शाश्वत विकासाच्या १७ म ूल्यांना अनुसरून कालिका स्टील कंपनीने क्रिएट उपक्रमांतर्गत एक महत्त्वपूर्ण स्पर्धा आयोजित केली होती राज्यभरातील तब्बल ४८ इंजिनियरिंग आणि आर्किटेक्ट कॉलेजमधील ३०० संघाने या स्पर्धे त सहभाग नोंदवला होता त्यापैकी ४८ संघ ही अंतिम फेरीस पात्र ठरल्यानंतर आज जालना शहरातील एका हॉटेलमध्ये या प्रकल्पांचे प्रदर्शन भरवण्यात आले प्रदर्शनानंतर ४८ संघापैकी तीन संघांना प्रथम द्वितीय आणि तृतीय पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. वेगवेगळ्या १७ मूल्यांना घेऊन विद्यार्थ्यांनी स्टील पासून आकर्षक प्रकल्प तयार करून या प्रदर्शनात मांडल्याचे पाहायला मिळालं यामध्ये न्याय आणि शांतता पाण्याखालची जीवन जमिनीवरील जेवण आरोग्य दारिद्र्य निर्मूलन लैंगिक समानता स्वच्छ पाणी उद्योग संशोधन आणि मूलभूत सुविधा अशा वेगवेगळ्या मूल्यावर आधारित हे ४८ उपयोग त्या प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

या प्रदर्शनात बीएनसीए म हाविद्यालय पुणे यांना एक लाखांचे प्रथम पारितोषिक, एस पी एस एम बी एच एस महाविद्यालय कोल्हापूर यांना ७५ हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक तर एमपीव्हीएस आर्किटेक्ट कॉलेज नाशिक यांना ५० हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक मिळाले आहे. या प्रदर्शनाला कालिका स्टील समूहाचे संचालक घनश्याम गोयल, अरुण गोयल, अनिल गोयल, मनोज जिंदल, गोपाल गोयल, गोविंद गोयल, अनुज बन्सल, आदींनी भेट देत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वितरण करण्यात आले.

### महाराष्ट्रातून एक हजार विद्यार्थ्याचा सहभाग - घनश्याम गोयल

कालिका स्टील आयोजित क्रिएट उपक्रम अंतर्गत घेण्यात आलेल्या या प्रदर्शनात राज्यभरातील ४८ महाविद्यालयातील तब्बल १ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळणार असल्याचे कालिका स्टीलचे संचालक घनश्याम गोयल यांनी म्हटले आहे.

युवा आदर्श

**उद्घाटन ना ...**

वाट पाहतोयं पूल
कधी होई उद्घाटन
वादविवाद रंगलेले
कोण दाबतो बटन
कधी धावणारं मेट्रो
तयार सजून स्टेशन
वेळ नसे साहेबांना
सुरु हो अधिवेशन
प्रकल्प अद्ययावत
कोण बोले क्शन
माहीत नाही केंव्हा
दौरा होईलं सॅक्शन
फुकट देणार शिधा
किडे खातात रेशन
सुरु ना केले वाटप
साहेबांची रे मिशन
घरकूल बांधून रेडी
कधी देता पझेशन
सोडत राहे खोळंबू
आले ना कमीशन
मंत्र्यांची वेळ ठरेना
कसेहोईल फंक्शन
निधी अडकूनि पडे
जोरात करू जशन
रस्ते अडवून ठेवले
अपघात हो भीषण
सर कापणारं फीत
तयार नाही भाषण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**

# अंगणवाडी परिसरात कचराच कचरा; गरोदर माता, बालकांचे आरोग्य धोक्यात

## टेंभुर्णीतील तेरा अंगणवाड्याची परिस्थिती सारखीच; साहित्याची कमतरता, सीसीटीव्हींची आवश्यकता

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील एकूण तेरा अंगणवाडी असून सगळ्या या घाणीच्या सानिध्यात आहे.या सर्व तेरा अंगणवाडी येथे झिरो ते तीन वय आणि वय तीन ते सहा वर्षाचा मुलांचे त्यांच्या आई आणि परिवाराच्या संपर्क येतो. वय झिरो ते तीन वय गटातील मुलांना शालेय पोषण घरी दिल्या जाते तरी वय गट तीन ते सहा यांचे लाभार्थी यांना तिथेच बसून पूर्व शालेय शिक्षण साठी चा आसलेल्या लाभ साठी थांबावे लागते.वय गट झिरो चे लाभार्थी ४८१असून तीन वर्ष ते सहा यांचे ४८१ इतके लाभार्थी आहे. म्हणजे तब्बल ९०४ लाभार्थी गरोदर महिला आणि स्तनदामाता यांची संख्या १७६ इतकी आहे. म्हणजे एकूण १०८० परिवार चा या अंगणवाडी ची संपर्क येतो या सर्वांना या अंगणवाडी समोरील घाणीचा सामना प्रत्येक वेळी करावा लागत आहे. ही सगळी घाण म्हणजे चक्र आजाराला आमंत्रण देणारी असून जर गावातील महिला आणि लहान बाळ सुरक्षित आणि तर गावं समजा आजारी पडल्या शिवाय कसे राहील. त्यांचे वाढले आजार. त्यांना का करता बेजार. अशी मागणी गावकरी करणार नाही तर काय हाच सवाल पुढे येत आहे.हाच प्रश्न घेऊन त्यांनी सगळ्या अंगणवाडी समोरील घाण कमी **पान २ वर**





# मौजपुरीच्या पठ्ठ्याने जिल्ह्यातही मारली बाजी

## अजिंक्य ढोकळे कुस्तीत तालुक्यापाठोपाठ जिल्ह्यात पहिला



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजपुरी येथील अजिंक्य सत्यनारायण ढोकळे या विद्यार्थ्याने तालुका स्तरावर ४१ वजन गटात १४ वर्षा खालील कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रम ांक मिळविल्यानंतर शुक्रवार (दि. १३) रोजी सायंकाळी झालेल्या जिल्हा स्तरिय कुस्ती स्पर्धे तही चमकदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. त्याची आता पुढील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने शालेय क्रीडा स्पर्धा सुरु आहेत. दरम्यान आज १४ वर्षाखालील ४१ वजन गटातील कुस्ती स्पर्धे त या स्पर्धेत मौजपुरी येथील अजिंक्य सत्यनारायण ढोकळे या विद्यार्थ्याने रंगतदार कुस्ती करीत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी कुस्तीचा डाव खेळत अजिंक्य ढोकळे याने प्रतिस्पर्धकाला चितपट करीत कुस्ती जिंकली. जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत अजिंक्य ढोकळे याने प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान **पान २ वर**

वैजोडा पाडळी वस्ती व नागापूरला भाजपा प्रदेश सचिव लोणीकर यांची भेट

# सरकारच्या ध्येय धोरणामुळे युवकांचा भाजपाकडे मोठा ओढा - राहुल लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या माध्यमातून भारत देश हा विकसित देशांच्या यादीत जाऊन बसला असून, राज्यातील शिंदे फडणवीस अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने युवक युवतींसाठी मोठ्या प्रमाणावर योजना कार्यान्वित केल्या असून या माध्यमातून युवक युवतींना रोजगार उपलब्ध होत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

ते नागपूर व वैजोडा पाडळी वस्ती येथे संपन्न झालेल्या सत्कार कार्यक्रमाला उत्तर देताना बोलत होते

महिला सक्षमीकरण हा ध्यास घेऊन लाडकी बहीण सारखी अतिशय महत्त्वकांक्षा व यशस्वी योजना राबवत राज्यातील सरकारने खऱ्या अर्थाने, महिलांना आत्मनिर्भर करण्यावर भर दिला असल्याचे सांगतानाच सर्वच वयोगटातील नागरिकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून राज्य सरकारने राज्यातील जनतेला खऱ्या अर्थाने दिलासा दिला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना ते म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी गेल्या पंचवीस तीस वर्षापासून सातत्याने संघर्ष करत मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणत मतदार संघाचा कायापालट केला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की देशासह राज्यातील व मतदार संघातील युवक वर्ग हा खऱ्या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी असून भाजपामध्ये रोज येणारे युवकांचे लोंढे हे येणाऱ्या विधानसभेत विजयाची नांदी ठरणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

यावेळी गावकऱ्यांच्या वतीने प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा सत्कार केला

यावेळी शत्रुघ्न कणसे, पद्माकर कवडे, **पान २ वर**

# संपादकीय

## डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ थंडावली

डाव्या विचासरणीचा बुलंद आवाज असे ज्यांचे वर्णन केले जाते ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार सीताराम येचुरी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ थंडावली. १२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेले सीताराम येचुरी हे भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थी दशेतच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली गाठली. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राची पदवी मिळवली. तिथेच ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियात सक्रिय झाले. या संघटनेचे ते तीन वेळा महासचिव बनले. पुढे त्यांना या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले. त्यानंतर ते कम्युनिस्ट पक्षात सक्रिय झाले. कम्युनिस्ट पक्षात त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या या कार्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्यांना केंद्रीय सचिव पदावर काम करण्याची संधी दिली. १९९२ साली चेन्नई येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या १४ व्या कॉंग्रेसमध्ये त्यांची पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरो सदस्य म्हणून त्यांनी भारतात कम्युनिस्ट पक्ष वाढवण्याचे मोठे कार्य केले. गावागावात, घराघरात कम्युनिस्ट पक्ष नेण्याचे प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांना पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यात मोठे यश मिळाले. या राज्यात कम्युनिस्ट पक्षाची सरकारे आली. संसदेतही कम्युनिस्ट पक्षाचे अनेक खासदार निवडून आले. सीताराम येचुरी हे स्वतः संसदेत निवडून गेले. संसदेतही त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडले. आपल्या बुलंद आवाजाने आणि अभ्यासपूर्ण भाषणाने त्यांनी संसद दणाणून सोडली. सीताराम येचुरी यांच्यावर पक्षाने अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या त्या त्यांनी लिलिया पेलल्या. त्यांनी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे अध्यक्षपद सांभाळले. पक्षाचे मुखपत्र असलेल्या पीपल्स डेमॉक्रासी या नियतकालिकाचे संपादक पदही त्यांनी भूषवले. महाराष्ट्राचे प्रभारी पद ही त्यांनी सांभाळले. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यांच्या निधनाने केवळ डाव्या विचरसरणीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हितासाठी आयुष्यभर झटणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशाने गमवला आहे. त्यांची पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचाराशी असलेली बांधिलकी हा राजकारणाचा क्षेत्रात आदर्श ठरणार आहे. राजकीय भुमिकांबाबत मतभिन्नता असूनही मनभेद असू नयेत अशी निखळ मानवतावादी वृत्ती जपणारे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

कॉम्रेड सीताराम येचुरी यांना अखेरचा लाल सलाम !!

कॉम्रेड सीताराम येचुरी अमर रहे!!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## अंगणवाडी परिसरात ...

करून स्वच्छ्ता करावी अशी मागणी केली आहे.

अंगनवाड़ी क्रमांक ८ धनगर गल्ली तील असून येथील पटसंख्या १२२ इतकी असून या अंगणवाडी बाबत त्यांनी स्वच्छ्ता करावी अशी मागणी संबधित अधिकारी ग्राम पंचायत यांच्या कडे कितेक वेळी केलेली असून त्याचा अद्याप फायदा झालेला नाही.या बाबत आम्ही या अंगणवाडी च्या पर्यवेक्षक एस के जाधव मॅडम यांच्या सोबत संपर्क केला असता या बाबत आम्ही ग्राम पंचायत कडे मागणी केली असून या स्वच्छ्ता च्या मागणी सोबत सी सी टी व्हि आणि वाल कंपाऊंड ची ही मागणी केली असून आमच्या कडे साहित्य ची कमी असून या बाबत वरिष्ठ अधिकारी यांच्या कडे ही आम्ही पाठ पुरावा करत असल्याचे त्यांनी सांगितले. सगळ्या अंगणवाडीच्या बाबत शासन यांनी योग्य ती सुख सुविधा दिली पाहिजे असे मत गांवकरी सय्यद मोहीयोद्दीन यांनी केली आहे.

## मौजपुरीच्या पठ्ठ्याने ...

मिळविला आहे. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, सरपंच बद्रीणारायण भसांडे, माजी सरपंच निवृत्तीराव गायकवाड, सत्यनारायण ढोकळे, नारायण गायकवाड, ज्ञानदेव गायकवाड, मनोहर डोंगरे, संजय महाडिक, सोनाभाऊ खडेकर, गणेश डोंगरे, विष्णु गायकवाड, बालाजी बळप, अंकुश काळे, अच्युत मोरे, कृष्णा हिवाळे यांच्या सह गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## सरकारच्या ध्येय ...

भगवान पाटोळे, विष्णू डोने, राहुल काळे काकासाहेब शिंदे रामा चव्हाण अरुण वाघमारे, संदीप तनपुरे सुनील गुजर विठ्ठल महाराज जाधव सुनील महाराज बोराडे दत्ता रोकडे उद्धव मांडगे, माऊली शिंदे एकनाथ खामकर गजानन वैद्य कृष्णा रोकडे गोविंद यादव, तुकाराम चव्हाण, आकाश रोकडे, दत्ता जाधव दौलत जाधव विष्णू टोणपे, संतोष बोराडे नारायण दत्ता मांडगे विठ्ठल रायकर, अनंत तुमचे अनंत टोणपे, अर्जुन मांडगे एकनाथ रोकडे कांता गायकवाड, विठ्ठल मस्के बाळू मस्के पिंटू बोराडे पप्पू मस्के राजेश काकडे हनुमान बोबडे रामचंद्र टोणपे अनिल गुजर विठ्ठल पवार राजू वाघ कैलास जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

# रायगड सांस्कृतिक कला मंडळ २०२४ कोकण रत्न पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यांना जाहीर

### माणगाव येथे २३ सप्टेंबर रोजी पुरस्काराचे आयोजन

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** रायगड सांस्कृतिक कला मंडळ, महाराष्ट्र राज्य रजि. सांस्कृतिक नातं जपणार व्यासपीठ या संस्थे मार्फत अतिशय मानाचा व पहिला कोकणरत्न पुरस्कार २०२४ पुरस्कार जेष्ठ व सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर यांना सोमवार दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी सांय ४ वाजता अशोकदादा साबळे विद्यालय, माणगांव येथे कोकणचे भाग्यविधाते मा.खासदार सुनिल तटकरे, आमदार भरतशेठ गोगावले, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष- मेघराज राजे भोसले यांच्या हस्ते व ॲड. राजीव साबळे यांच्या अध्यक्षतेखाली अशोकदादा साबळे विद्यालय, माणगांव येथे संपन्न होणार आहे.

सचिन पिळगांवकर सरांच्या चित्रपटसृष्टीतील ६२ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतल्यास त्यांच्या बालवयातील पाचव्या वर्षा पासूनच म्हणजेच १९६३ साली पासून आपल्या अभिनयाच्या प्रवासाला सुरुवात केली. आपल्या अलौकिक प्रतिभेने आपण मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन देशातच नव्हे तर जगभरातील सिनेरसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवत आपल्या अष्टपैलु विनोदी, भावनिक, सामाजिक संस्कारक्षम विविधरंगी भूमिकांमधून आपण प्रेक्षकांच्या मनात विशेष असे स्थान मिळवले आहे. त्यांच्या चित्रपटातील प्रदिर्घ यशस्वी कारकिर्दीचा आढावा घेतल्यास, 'हा माझा मार्ग एकला' (१९६३) या मराठी चित्रपटातुन सिनेसृष्टीत आपल्या लहानपणा पासूनच सुरुवात करून, प्रौढ भूमिकां कडे वळण्यापूर्वी गीत गाता चल (सन-१९७५) सारख्या अत्यंत यशस्वी रोमॅण्टिक चित्रपटांचा भाग बनण्या पूर्वी बाल कलाकार म्हणून सुमारे ६५ चित्रपटांमध्ये लक्षणीय काम केले आहे. बालिका वधू (१९७६), आँखियों के झरोखों से (१९७८) आणि नदिया के पार (१९८२), मुख्य अभिनेता म्हणून आपण भारतातील प्रत्येक घराघरात सुपरिचित झाले आहात.

विशेष म्हणजे हिंदी, मराठी तसेच कन्नड भोजपुरी सिनेमांमध्ये देखील आपल्या खास अभिनयाचा ठसा उमटवत काम केले आहे. यानंतर बदलत्या काळानुरुप तू तू मैं मैं ( सन २००० ) तसेच कडवी खट्टी मेथी यासह भारतीय टेलिव्हिजन(दूरदर्शन) वरील यशस्वी कॉमेडी शोमध्ये चमकदार अभिनयासह निर्मिती आणि दिग्दर्शन देखील केले आहे . मै बाप (१९८२), नवरी मिळे नवऱ्याला



(१९८४) पासून सुरू होणारे अनेक हिट गाजलेल्या मराठी चित्रपटांतील दिग्दर्शनही बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक हिट ठरले. अशी ही बनवा बनवी (१९८८) आणि आमच्या सारखे आम्हीच (१९९०) बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरले आहेत. नवरा माझा नवसाचा (२००४) देखील सुपर-डुपर हिट ठरला. आणि २००७ मध्ये आपण कन्नड सिने-सृष्टीतील 'एकदंथा' या चित्रपटातून पदार्पण केले तेच मुळी कन्नड स्टार विष्णुवर्धन सोबत, नवरा माझा नवसाचा हा याच चित्रपटाचा रिमेक होता.

सध्या नुकताच २० सप्टेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणारा व संपुर्ण महाराष्ट्राभर चर्चित असलेला 'नवरा माझा नवसाचा २' हा चित्रपट देखील आपल्या सर्वांच्या भेटीला येत आहे... अनेक चित्रपटांमध्ये आपल्या बहुरूपी भूमिकांनी प्रेक्षकांना खळखळून, पोटधरुन हसवले तसेच काही चित्रपटातील आपल्या अभिनयाने भावनिक साद घालीत रडवले देखील आहे. आपल्या विविध कला आणि संवेदनशील गुणांमुळे आपणांस सुसंस्कृत अनोखा अभिनेता म्हणून विशेष ओळखले जाते.

त्यांच्या लेखन, दिग्दर्शन, निर्मिती आणि गायनाच्या क्षेत्रातील अपार मेहनतीच्या जोरावर आपण सतत केलेल्या नाविन्यपूर्ण कलात्मक कार्याने देखील चित्रपटसृष्टीत नवे मापदंड स्थापित करुन एका खास यशस्वी वळणावर आणले आहे. आपण आपल्या कुटुंबातील प्रत्येका सोबत अनेक चढ-उतार वादळी तसेच संघर्षमयी जीवनात देखील आपण नेहमी सकारात्मक उभे राहत नव्या पिढीसमोर एक वेगळा आदर्श आहात याची आम्हांला मनापासुन जाणीव आहे. आपल्या सहवासाने व मार्गदर्शनाने चित्रपटसृष्टीतील अनेक नवोदितांना प्रेरणा मिळाली आहे.

सर्वोत्कृष्ट अभिनय, कलेची समर्पणता, समाजसेवा, व मनमिळाऊ स्वभाव यांमुळे आपण मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी अमिट छाप उमटवली आहे. आपल्या या अनमोल योगदानाची नोंद घेऊनच स्वप्न नगरी शहरांपासून आम्ही रसिकप्रेमी दूर जरी असलो तरी त्यांचे प्रचंड (डाय हार्ट फॅन) चाहते रसिक प्रेक्षक आहेत. तरी ज्येष्ठ सचिन पिळगांवकर अशा असामान्य व अष्टपैलु व्यक्तिमत्त्वाच्या सोहळ्यास माणगांव - रायगड ( कोकण) मधील सर्व माय - बाप रसिक प्रेषकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजिका व सक्रेटरी सौ. अंकीता अजय मोरे यांनी केले आहे.

# श्याम ठाणेदार वादळी सन्मान पुरस्काराने सन्मानित



**श्रीगोंदा । प्रतिनिधी -** अहिल्या नगर येथून प्रकाशित होणाऱ्या वादळी स्वातंत्र्याच्या तपपूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांना वादळी सन्मान पुरस्काराने सुवर्णाताई पाचपुते, दिग्विजय नागवडे, साप्ताहिक वादळी स्वातंत्र्यचे संपादक जितेंद्र पितळे, उपसंपादक बाळाप्रसाद मंत्री, बाळासाहेब नाहटा, आदर्श शिक्षक रामदास ठाकर आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात साप्ताहिक वादळी स्वातंत्र्यचा विशेष अंक प्रसिद्ध करण्यात आला. श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना वादळी सन्मान पुरस्कार देण्यात आला. श्याम ठाणेदार हे साप्ताहिक वादळी स्वातंत्र्यमध्ये नियमित लेखन करतात. स्तंभलेखन करतात. साप्ताहिक वादळी स्वातंत्र्य मध्ये त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत म्हणूनच त्यांना वादळी पुरस्काराने गौविण्यात आले आहे. श्याम ठाणेदार यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार विनोद कळंबे यांना प्रदान

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** पहाट फाऊंडेशन छत्रपती संभाजीनगर च्या वतीने उत्कृष्ट शैक्षणिक व सामजिक कार्यासाठी देण्यात येणारा पहाट महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार टेंभुर्णी येथील युगंधर प्रतिष्ठान चे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विनोद कळंबे यांना शनिवारी ता.१४ छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या समारंभात प्रदान करण्यात आला.यावेळी चैत्राम पवार,डॉ जीवन राजपूत,मारुती म्हस्के,प्रसिद्ध कवी दंगलकार नितीन चंदनशिवे,प्राचार्य डॉ. पी. एम. शहापूरकर, प्रा रमेश गावित,अर्पिता सुरडकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विनोद कळंबे हे खानापूर जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.ग्रामस्थांचे सहकार्य व लोकसहभाग या माध्यमातून खानापूर शाळेचा कायापालट करण्याचे काम त्यांनी केलेले शेकडो पदवीधर युवकांसाठी घरपोच पदवी अभियान याशिवाय पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक विषयांना वाचा फोडलेली आहे असे अनेक सामजिक उपक्रम



आहे. याशिवाय युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून शेकडो कोरोना योध्यांचा सन्मान,ऊसतोड मजुरांच्या फडावर दिवाळी,शेकडो गरजू रुग्णांना आर्थिक मदत यासह त्यांनी राबविले आहे त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल जाफराबाद तालुक्यातील सर्व स्तरातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# नवभारत कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील श्रीमती जेबीके विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय मध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त मुलांनी शिक्षकांच्या भूमिकेत येऊन दिवसभर शिकवण्याचं काम केलं. यातील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयातील मुलांनी शिकवण्याचं काम केलं त्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आलं. यास नऊ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

इतिहास विषय शिकवणाऱ्या कुमारी कल्याणी नवले, समाजशास्त्र विषय शिकवणाऱ्या भारती वर्गणी, ऋतुजा वर्गणी, अर्थशास्त्र शिकवणाऱ्या कल्याणी नवले, राज्यशास्त्र शिकवणाऱ्या कल्याणी नवले, मराठी विशेष शिकवणाऱ्या कोमल ठेवून, हिंदी शिकवणाऱ्या लक्ष्मी शिंदे, इंग्रजी विशेष करणाऱ्या लक्ष्मी शिंदे, इंग्रजी विशेष शिकवणाऱ्या वैशाली खांडेभराड या विद्यार्थिनींना बक्षीस वितरण करण्यात आलं. तसेच इयत्ता नववी मध्ये शिकवण्याचं काम करणाऱ्या विद्यार्थिनींना सुद्धा यावेळी बक्षीस वितरण करण्यात आले. या बक्षीस वितरणामध्ये अध्यक्षस्थानी होते प्राचार्य नंदकुमार काळे, प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य तथा संचालक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, उपमुख्याध्यापक पंजाब सोळंके, धनंजय पुराने, यावेळी बक्षीस वितरणामध्ये, प्राध्यापक,सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भागे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रवींद्र मोरे रमेश इंगळे, भीवसान ससाने, कैलास भुतेकर, राजेंद्र जगताप, दीपक देशमुख, यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमास विष्णू जाधव, संजीव कुलकर्णी संजय कुलकर्णी, दत्ताउखर्डे, भिलावेकर मॅडम लंबे मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, आदींच्या हस्ते सुद्धा बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल ची जाणीव निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यामध्ये समस्या सोडवण्यासाठी अनुभव यावे, असेच बक्षीस वितरणाबद्दल सांगताना सांगितले की ही बक्षीस यातून प्रेरणा मिळून सुजान नागरिक निर्माण करण्याची ही संकल्पना असून असे अनेक कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांनी स्वतः हून पुढे येऊन कार्यक्रमात भाग घेतला पाहिजे आणि मी आपल्या मध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे हे सुद्धा सांगितले.



# अखेर जनार्दन रेगुडे यांना २८ वर्षानंतर न्याय!

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक न्यायालयाने २८ वर्षाच्यास प्रदिर्घ कायदेशीर लढाईनंतर बजाज ऑटो कंपनीचे माजी कर्मचारी जनार्दन रेगुडे यांना न्याय दिला. काही आरोपाच्या आधारे जनार्दन रेगुडे यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आल होते, परंतु कामगार न्यायालयाने बजाज ऑटो कंपनीने केलेली चौकशी अन्यायकारक आणि अपुर्ण असल्याचे मानले आणि चौकशी अधिकार्याचे निष्कर्ष चुकीचे असल्याचे ठरवले. कामगार न्यायालयाने बजाज ऑटो कंपनीने दिलेली शिक्षा योग्य नसल्याचे ठरवले. जनार्दन रेगुडे यांना सेवेत सातत्य आणि २५ टक्के मागील वेतनासह पून्हा कामावर घेण्याचे आदेश दिले आहेत.

बजाज ऑटो कंपनीने या निर्णयाला संभाजीनगर येथील औद्योगिक न्यायालयात पूनर्विचार याचिकेव्दारे आव्हान दिले. त्याच वेळी' रेगुडे यांनी १०० टक्के मागील वेतनासाठी स्वतंत्र्य पूनर्विचार याचिका दाखल केली. औद्योगिक न्यायालयाने बजाज ऑटो कंपनीने दाखल केलेली पूनर्विचार याचिका फेटाळली तर जनार्दन रेगुडे यांची पूनर्विचार याचिका अंशतः मान्य करुन त्यांना कामगार न्यायालयाने दिलेल्या २५ टक्के ऐवजी ७५ टक्के मागील वेतन मंजुर केले. याशिवाय औद्योगिक न्यायालयाने बजाज ऑटो कंपनीला जनार्दन रेगुडे यांना इतक्या वर्षापासून नौकरीपासून दूर ठेवल्यामुळे २५ हजारांचा दंड आकारला. या प्रकरणात ॲड. उल्हास सावजी यांनी जनार्दन रेगुडे यांचे कामगार आणि औद्योगिक न्यायालयात प्रतिनिधित्व केले तर बजाज ऑटो कंपनीतर्फे ॲड.सचिन डंख यांनी प्रतिनिधीत्व केले. तब्बल २८ वर्षानंतर रेंगूडे यांना न्याय मिळाल्याने त्यांनी न्यायालयाचे धन्यवाद व्यक्त केले आहे.

श्री पी.एस. डी.टी.पी.ॲण्ड मल्टीसर्व्हीसेस्
झेरॉक्स

| | |
|---|---|
| बॅनर | मनी ट्रान्सफर |
| लग्न पत्रिका | ऑनलाईन फॉर्म |
| बिलबुक | स्पायरल बायडिंग |
| व्हिजेटींग कार्ड | लॅमिनेशन |
| लेटर पॅड | प्रोजेक्ट रिपोर्ट |
| पावती बुक | ऑल जॉब वर्क्स |
| पासपोर्ट फोटो | सर्व फॉर्म |
| कलर झेरॉक्स | प्रिंट |

सर्व कामे अर्जंट व स्वस्त दरामध्ये करून मिळेल.
पत्ता :- मामा पेढेवाल्याच्या बाजुला, भांदरगे वकील समोर, शनी मंदिरजवळ, जुना जालना
मो.नं.9309588300

# वक्तृत्वाची कला मुलांमध्ये निश्चितपणे विकसित होईल - भास्करराव अंबेकर

## खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न - पांगारकर; वक्तृत्व व रांगोळी स्पर्धेला प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** वकृत्व ही एक कला असून स्पर्धेत भाग घेणाऱ्या मुलांमध्ये ही कला निश्चितपणे विकसित होईल असा विश्वास शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी आज येथे बोलतांना व्यक्त केला. जालना गणेश महासंघातर्फे आज रविवारी जुना जालना भागातील मुक्तेश्वर लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व आणि रांगोळी स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, सिद्धिविनायक मुळे, दुर्गेश काठोठीवाले, सौ.शुभांगी देशपांडे, सौ.संध्या देठे, सौ.वैशालीताई पांगारकर, डॉ. शिवनंदा म्हेत्रे, सौ. जाधव, सौ.यशोमती पांगारकर आदींची

प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, गणेश महासंघातर्फे यावर्षी अत्यंत चांगले उपक्रम राबवले असून या उपक्रमाबद्दल त्यांनी महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर आणि त्यांच्या सर्व टीमचे मनापासून कौतुक केले. शब्दांचे महत्त्व संतांनी अभंगातून सांगितल्याचे विशद करून घरात सुद्धा युद्धाची भूमी तयार होऊ शकते इतकी ताकत शब्दात आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते स्व. प्रमोद महाजन हे उत्तम वक्ते होते. शाळा, महाविद्यालयीन पातळीवर होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धांच्या माध्यमातूनच ते सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुढे आले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि प्रमोद महाजन यांच्या भाषणाचे आपल्याला खूप आकर्षण होते असे सांगून अंबेकर म्हणाले की, फर्डा वक्ता जर असेल तर त्याचा प्रभाव निश्चितच श्रोत्यांवर पडत असतो. जालना गणेश महासंघाच्या वतीने आयोजित

वकृत्व स्पर्धेत भाग घेणाऱ्या मुलांमध्ये देखील वक्तृत्वाची कला निश्चितपणे विकसित होईल असा विश्वास व्यक्त करून रांगोळी काढणे ही देखील एक कल्पकता असून रांगोळीतील नावीन्यपूर्ण कल्पक्तेमुळे प्रत्येकांच्या घरातील वातावरणात प्रसन्नता निर्माण होते. विविध स्पर्धांच्या माध्यमातून महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी गणेश महासंघाचा जान आणल्याचे अंबेकर म्हणाले. तत्पूर्वी सिद्धिविनायक मुळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी स्पर्धा आयोजित करण्यामागील भूमिका विषद केली. ते म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक उपक्रम राबविने हा देखील या उत्सवामागील उद्देश आहे. या उत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांची जोड देऊन जालनेकरांना चांगला संदेश देण्याचा प्रयत्न जालना गणेश महासंघाच्या माध्यमातून करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील गुणवत्तेला चालना मिळावी, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून भविष्यात देखील अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल अशी ग्वाही पांगारकर यांनी शेवटी दिली. यावेळी वक्तृत्व आणि रांगोळी स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, स्मृती चिन्ह आणि रोख बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. जयश्री वाढेकर, प्रा. सीमा सरपोतदार, प्रा.जालिंदर बटूळे, प्रा.चंद्रकांत धोत्रे, श्रीकांत चिंचखेडकर, राजेंद्र बावकर, श्रीमती मेघा जोशी यांनी तर रांगोळी स्पर्धेचे परीक्षण अरविंद देशपांडे आणि विजया कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. आर. जोशी यांनी तर शेवटी आभार शिवराज जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय आटोळे, रामदास कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास स्पर्धक, पालक, शिक्षक आणि जालना गणेश महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष प्रयत्न

# ५३ ग्रामपंचायत इमारती बांधकामासाठी १० कोटी ९५ लक्ष रुपये निधी मंजूर

**परतूर । प्रतिनिधी -** गाव पातळीवर ग्रामीण भागातील जनतेचे कामे सुरळीतपणे पार पडावी यासाठी परतूर मंठा जालना ग्रामीण मधील नवीन ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींना मंजुरी भेटली असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना, सरपंच उपसरपंच सदस्य व प्रशासकीय अधिकाऱ्यांना काम करण्यासाठी उत्तम व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी या नवीन इमारतीचा



उपयोग होणार असून या माध्यमातून गाव गाड्यांचा कारभार जलद गतीने चालावा अशी अपेक्षा असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार नमूद केले आहे. मंठा तालुक्यातील अर्डा खारी (२०) लक्ष, कटाळा बुद्रुक(२०) लक्ष जांभरुण(२०) लक्ष ठेंगेवडगाव (२०) लक्ष पोखरी टकले (२०) लक्ष केंदळे पोखरी(२०) माळकिनी(२०) लक्ष रामतीर्थ (२०) लक्ष वाटुर तांडा(२०) हनवत खेडा(२०) अंभोरा शेळके(२०) लक्ष केहाळ वडगाव (२०) कीर्तापूर(२०) लक्ष करणावळ (२०) लक्ष गुळखंड (२०) लक्ष टोकवाडी (२०) लक्ष टाकळखोपा(२०) लक्ष तळतोंडी (२०) लक्ष दहा (२०) लक्ष पाडळी दुधा (२०) लक्ष गडदे पांगरा (२०) लावणी(२०) लक्ष लिंबे वडगाव (२०) लक्ष वीरगव्हाण(२०)लक्ष वाघोडा तांडा (२०) सोनूनकरवाडी (२०) लक्ष दहिफळ खंदारे (२५) लक्ष पांगरी बुद्रुक(२५) लक्ष माळेगाव (२५) लक्ष शिवनगिरी(२५) हेलस (२५) लक्ष तर परतूर तालुक्यातील बामणी (२०) हनुवडी(२०) लक्ष श्रीधर जवळा (२०) अंगलगाव (२०) आसनगाव (२०) लक्ष सावरगाव बुद्रुक (२०) माव पाटोदा (२०) लक्ष चांगतपुरी (२०) लक्ष फुलवाडी (२०) लक्ष मापेगाव बुद्रुक (२०) लक्ष डोलारा (२०) लक्ष परतवाडी (२०) तर जालना ग्रामीण तालुक्यातील नेर शेवली भागातील शंभू सावरगाव (२०)लक्ष सोनदेव (२०) लक्ष ढगी (२०)लक्ष पळसखेडा (२०) लक्ष काकडा (२०) लक्ष डांबरी (२०) लक्ष रुपयांचा निधी मंजूर झालेला असून लवकरच नवीन ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

---

# सोयाबीन पीकं पडताहेत पिवळी



**तडेगाव । प्रतिनिधी -** नळणी तडेगावसह परिसरात सोयाबीन चे पीक फुलोरा अवस्थेत आहेत परंतु वातावरणातील बदललामुळे सोयाबीन पीकावर रोगराईचा प्रादुर्भाव अधिक दिसून येत आहेत अळी व बुरशी मुळे सोयाबीन पीकाची नुकसान होण्याची शक्यता जास्त प्रमाणात आहे .शिवाय सोयाबीन पीकाची पाने पिवळी होत आहेत. शिवाय कपाशी पीकावर सुद्धा मावा व पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.अळीचे प्रमाण अधिक आहेत. त्यामुळे महागडी कीटकनाशके फवारणी करावी लागत आहेत त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे. दरम्यान पाउसाने उघडीप दिल्याने शेतकरी अंतरमशागतीच्या कामत व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहेत.

---

# आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जाफराबाद येथे शिवसेनेची आढावा बैठक

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दि. १४ रोजी शिवसेनेची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. २०२४ मध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुकीची पूर्व तयारी साठी बैठकीत उपजिल्हाप्रमुख रमेश पा. गव्हाड हे मार्गदर्शन करत असताना पुढे म्हणाले की, भोकरदन जाफराबाद हा विधानसभा मतदार संघ सुरवातीपासूनच भगव्याच्या विचाराचा असुन शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून अशी या मतदार संघाची ओळख आहे. आजही या मतदार संघात नेते जरी कमी झाले असले,तरी बाळासाहबांच्या विचाराने प्रेरित होऊन उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मतदार



राजा बहुसंख्येने शिवसेनेच्या पाठीशी खंबीर पने उभा असल्याचे अनेक निवडणुकीत दाखऊन दिले आहे. त्यामुळे हा मतदार संघ आघाडी मध्ये शिवसेनेसाठी सोडण्यात यावा या साठी वरिष्ठांकडे आग्रही राहणार आहोत असेही यावेळी सांगण्यात आले.

बैठकीत रमेश गायकवाड, राजु सोनवणे, रमेश धवलिया, शिवाजीराव गावंदे, उत्तमराव वानखेडे, परमेश्वर जगताप, मनीष श्रीवास्तव यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तर यावेळी जाफराबाद शहरातील भाजपचे माजी नगरसेवक प्रकाश दिवटे व युवा मोर्चा चे मुकेश माकोडे, यांचा शिवसेनेमध्ये प्रवेश करण्यात आला आहे.

उपस्थितांमध्ये उपजिल्हाप्रमुख रमेश पा. गव्हाड,मनीष श्रीवास्तव परमेश्वर जगताप,माजी जिल्हापरिषद अध्यक्ष उत्तमराव वानखेडे,माजी समाजकल्याण सभापती रमेश धवलीया,माजी तालुका प्रमुख शिवाजीराव गावंदे, तालुकाप्रमुख कुंडलिक पा. मुठ्ठे, मंगेश गव्हाड,जेष्ठ शिवसैनिक हरीचंद्र पा म्हस्के,माजी प स सदस्य रमेश गायकवाड,शहर प्रमुख देवीसिंह बायस, उपतालुकाप्रमुख चंदू पा शिंदे,शिवाजी पा म्हस्के, बाबासाहेब बोरसे,परमेश्वर सरोदे, समाधान पा सवडे, विष्णु पा लोखंडे,मोहम्मद फैसल,शेख इरफान, युवा तालुका पदाधिकारी देविदास सवडे, नागोराव बंगाळे, गणेश सवडे,दामू आण्णा उबाळे, यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

---

नायगाव येथे शिवसेना शाखेचे उदघाटन

# गाव तिथे शाखा घर तिथे शिवसैनिक - उदयसिंह बोराडे

**मंठा । प्रतिनिधी -** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन शहरा सोबतच ग्रामीण भागात गतिमान पध्दतीने पायाभूत सुविधा पुरवत आहे. गाव पातळीवर नेतृत्व करणाऱ्या तरुणांनी शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करून विकासाचा आराखडा तयार करावा, मुख्यमंत्र्यांकडून निधी मिळून देण्यास आपले प्रयत्न कमी पडणार नाही. अशी ग्वाही शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी आज दिली. नायगाव येथे रविवार (ता.१५) शाखा उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलताना म्हणाले. व तसेच माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर व शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल, प्रल्हादराव बोराडे यांच्या माध्यमातून मंठा तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन युवकांची मोठी फळी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे



शिवसेना तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे यांनी बोलताना सांगितले.

मंठा तालुक्यात शिवसेना शिदे सरकार स्थापन झाल्यापासून अनेक विकासकामांना गती मिळाली आहे. तसेच शेतकऱ्यांचे ही अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत.तसेच मुख्यमंत्री वैदाकिय सहायता निघी मधून देखील भरपूर रुग्णांना लाभ भेटलेला आहे त्याचप्रमाणे तालुक्यातील सर्वच जाती धर्माचे युवा तरुणांना रोजगारीचा लाभ मिळाला असल्याने शिवसेने विषयी जनसामान्य लोकांची सहानुभूती ची लाट निर्माण झाली आहे. शिवसेनेचे विचार तळागाळात जावे यासाठी शिवसेना - युवासेना मंठा तालुक्याच्या वतीने एक आगळे वेगळे अभियान सुरू करून युवकांची मोठी फळी निर्माण करणार असल्याचे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी सांगितले. यावेळी युवा सेना उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे, शिवसेना उप तालुकाप्रमुख रामराव वरकड, दलित आघाडी तालुका प्रमुख दिलीप हिवाळे, भीमराव वाघ, संजय राठोड, पवन खरात, सुनील गुंड व गावातील शाखा पदाधिकारी, माजी सरपंच प्रल्हाद सांगळे, शंकर राठोड, नारायण राठोड, महेश राठोड, तुकाराम फुफाटे, प्रदीप राठोड, गणेश राठोड, भागवत राठोड, राजकुमार राठोड, समाधान राठोड, गणेश घुगे, युवराज राठोड, रामेश्वर राठोड, संदीप चव्हाण, संपत आढे, उमेश राठोड, ऋषिकेश सांगोळे, श्रीराम चव्हाण, रामराव चव्हाण, अशोक मगर, छगन राठोड आदींची उपस्थिती होती.

---

# चिंचखेडा येथे एक गाव एक गणपती संकल्पना कायम; जाफराबाद पोलीस प्रशासनाकडून प्रशंसा



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजे चिंचखेडा येथे गेल्या ३० वर्षापासून एक गाव, एक गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते यावर्षीही मंगलमूर्ती नवतरुण गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून जाफराबाद पोलीस प्रशासनाने सदरील गणेश मंडळास भेट देऊन पदाधिकारी व गावकऱ्यांची प्रशंसा केली आहे.कायदा व सुव्यवस्था पाळून शांततामय व भक्ती भावाने दरवर्षी गणेशाची स्थापना करून शांततेत विसर्जन करण्यात येते यावर्षीची कार्यकारी पुढीलप्रमाणे अध्यक्ष - गणेश प्रकाश मुळे.उपाध्यक्ष-शंकर गजानन मुळे,सचिव-आकाश शिवाजीराव मुळे,व्यवस्थापक-संतोष रामेश्वर मुळे,कोषाध्यक्ष-श्रीराम शेषराव मुळे तर सदस्य रामेश्वर सरोदे,विष्णू सुखदेव मुळे,पंकज सुखदेव सरोदे,पवन काशिनाथ मुळे,निवृत्ती बुझाडे,संदेश सरोदे,आकाश सरोदे,आदिसह सर्व ग्रामस्थांचे सहकार्य असते.

---

# जालना जिल्ह्यातील संघटनात्मक बैठक; खा. डॉ. भागवत कराड यांची प्रमुख उपस्थिती

जालना । प्रतिनिधी - जालना जिल्ह्यातील विधानसभा ची संघटनात्मक बैठक माजी केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा महाराष्ट्र बूथ रचना प्रमुख खा. डॉ.भागवत कराड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, जालना येथे रविवार (दि.१५) रोजी संपन्न झाली.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश सदस्य राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, देविदास कुचे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, अर्जुन गेही, दिपक ठाकूर, गणेश बापू फुके, विजय कामड, धनंजय कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी खा.डॉ.कराड म्हणाले की, देशाच्या पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी विराजमान झाल्यानंतर देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी अनेक चांगल्या योजना व विकासाची मोठी गती वाढली आहे, भाजपा कार्यकर्त्यांनी गाव पातळीवर बूथ संघटन मजबूत करा, आपले संघटन जर मजबूत असेल तर भाजपाला कोणीही हरवू शकत नाही. त्यामुळे भाजपा पदाधिकारी आणि बुथ प्रमुखांनी केंद्र व राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजना ग्रामीण भागातील सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करून संघटन मजबूत करावे त्यांनी बोलताना सांगितले.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना शहरी व ग्रामीण भागात पोहोचविण्याचे काम भाजपा पदाधिकाऱ्यांनी करून पक्ष संघटन वाढवून आगामी निवडणुका लढण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे म्हणाले की, आगामी काळात होणाऱ्या निवडणुका जिंकण्यासाठी बूथ सक्षमीकरणावर पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी भर द्यावा. सर्व बूथ प्रमुखांनी आपला व्हाट्सअपचा ग्रुपही तयार करावा. या माध्यमातून सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवणे सहज शक्य होईल असे हि ते म्हणाले.

यावेळी जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर म्हणाले की, मेरा बूथ सबसे मजबूत या नुसार सर्वांनी मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधत त्यांना सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्याकरिता प्रयत्न करावे. विविध योजनांची माहिती उपस्थित बूथ प्रमुखांना द्यावी. आपण जगातील नंबर एकच्या राजकीय पार्टीचे सदस्य असून आपली ही पार्टी नुसती राजकीय पार्टी नसून एक परिवार आहे. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने भाजपकडून बूथ सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे असे हि त्यांनी सांगितले.

यावेळी मुकेश चिने, विजय परिहार, वसंतराव जगताप, भीमराव जावळे, बबनराव सिरसाठ, सुभाष सोमेश काबलीये, दत्ता जाधव, बद्री वाघ, संतोष खंडेलवाल, सय्यद इम्रान, कृष्णा गायके, डोंगरसिंग



बोडखे, कैलास उबाळे, सुप्पडसिंग जगरवाल, सुरेश दिवटे, सिद्धेश्वर हसबे, सुधाकर खरात, वसंतराव शिंदे, ज्ञानेश्वर भागिले, प्रदीप पवार, अनिल सरकटे, अभिजित अंभोरे, कृष्णा खिल्लारे, मुकेश चव्हाण, साबळे, राजू साळवे, विनायक मामा पवार, नागेश अंभोरे आदींसह जालना, भोकरदन, बदनापूर विधानसभेतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जंक फुड खाणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण - प्रा. बी.वाय. कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या युगात प्रत्येक जण धावपळीत आहे. त्यामुळे आरोग्याकडे प्रचंड दुर्लक्ष होत आहे. या धावपळीत प्रत्येक जण जंक फुड खाण्याकडे कळत न कळत वळत असतो. परंतु त्याचे परिणाम त्याच्या आरोग्यावर गंभीरपणे होतांना दिसून येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी व घरचा आहार घ्यावा, असे प्रा. बी.वाय. कुलकर्णी आवाहन त्यांनी केले.

जालना शहरातील शांतीनिकेतन नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजित कॉलेजच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, उद्योजक महेंद्र देशपांडे, माजी जि.प. सदस्य हरिहर शिंदे, प्रा. राम कदम, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, संचालक अश्विन अंबेकर, प्राचार्या लियंता निर्मल, प्रा. धनंजय सोनवणे, पांडूरंग काळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना प्रा. बी.वाय. कुलकर्णी म्हणाले की, कोरोना काळात डॉक्टर व परिचारिका त्यांचे कार्याचे महत्व सर्वांनीच जाणले. आपल्या जीवावर उदार होवून त्यांनी लोकांचे प्राण वाचविण्यासाठी कठोर परिश्रम केले. आज या महाविद्यालयात शिकून परिचारिका होत असलेल्या



विद्यार्थ्यांनीही अत्यंत चांगले ज्ञान घेवून भावी आयुष्यात रुग्णांची चांगली सेवा करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजक तथा जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जालना शहरातील अभ्यासु व्यक्तीमत्व व शहराचे वैभव असलेले प्रा. बी.वाय. कुलकर्णी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून शांतीनिकेतन नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी बोलतांना म्हणाले की, शांतिनिकेतन हे नाव जिल्ह्यात गुणवंतापुर्ण शिक्षणासाठी घेतले जाते. आगामी काळात संस्थेचे हे नर्सिंग कॉलेजही गुणवत्तापुर्ण शिक्षणाची ओळख कायम ठेवील. विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करुन भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमात प्रा.बी.वाय. कुलकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शांतिनिकेतन विद्या मंदिर शाळेतील ७५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या लियंता निर्मल यांनीही विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अंबादास घायाळ यांनी केले.

यावेळी विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे, विशाल वाघ यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वच्छता अभियान राबवुन एक आदर्श गाव घडवावे - पंजाबराव लहाने



**जालना । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील म्हसरूळ येथील स्वच्छताधुत श्री पंजाबराव भुजंगराव लहाने यांनी बोलताना सांगितले की मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्ह्यात तालुक्यात गावागावात स्वच्छता अभियान राबवून घनकचरा स्वच्छता करून गाव स्वच्छ सुंदर करण्यासाठी श्रमदानाची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त शिपाई स्वच्छता धुत श्री पंजाबराव भुजंगराव लहाने यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत सांगितले आहे या १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने गाव परिसर स्वच्छ करून सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रोगराई मुक्त होऊ शकते सध्या विहीरीना नवीन पाणी आले असल्याने त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना साथीचे आजार होऊ शकते यासाठी गाव परिसर स्वच्छता अभियान राबविणे काळाची गरज असल्याचे मत स्वच्छतादुत श्री लहाने यांनी शेवटी बोलताना सांगितले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.